# वृत्तपत्र कात्रणे

महाराष्ट्र शासन

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

नागपूर-अमरावती विभाग,

जुने सचिवालय, नागपूर

dirinfngp@gmail.com /dirnfingp2015@gmail.com

दूरध्वनी : ०७१२-२५६५१०८, २५६०६५२

dirinfngp.blogspot.in @InfoVidarbha dirinfNagpur

वृत्तपत्राचे नाव : दैनिक महाराष्ट्र टाईम्स

प्रकाशन स्थळ : नागपूर

दिनांक : 18 APR 2023


# निवडा करिअरच्या नव्या सागरी वाटा

## कुलगुरू मालिनी शंकर यांचे विद्यार्थ्यांना आवाहन

म.टा. प्रतिनिधी, नागपूर

'समुद्र आणि त्याच्याशी निगडीत जहाज बांधणी, प्रशिक्षण, व्यवस्थापन, असे विविध कोर्सेस उपलब्ध करून देणाऱ्या चेन्नईस्थित भारतीय सागरी विद्यापीठात करिअरच्या अनेक संधी प्रशस्त करणारे अभ्यासक्रम आहेत. विदर्भातील विद्यार्थ्यांनी करिअरच्या या नवीन वाटा निवडाव्यात', असे आवाहन भारतीय सागरी विद्यापीठाच्या कुलगुरू मालिनी शंकर यांनी केले आहे.

विद्यापीठाच्या नवीन शैक्षणिक सत्रातील प्रवेश आणि अध्यापकांच्या भरावयाच्या पदांबाबत शंकर यांनी



कुलगुरू मालिनी शंकर

माहिती दिली. सागरी विद्यापीठाद्वारे चालविण्यात येणाऱ्या विविध अभ्यासक्रमाला विदर्भातील विद्यार्थ्यांनी प्रवेश घेऊन करिअरसाठी नवा पर्याय निवडावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. विद्यापीठाचे कोची, मुंबई, नवी मुंबई, कोलकाता, चेन्नई, विशाखापट्टणम येथे कॅम्पस असून येथे तीन हजार विद्यार्थ्यांची क्षमता आहे.

### नवीन सत्र १० जूनपासून

विद्यापीठाच्या नवीन शैक्षणिक सत्रासाठी १४ एप्रिलपासून अर्ज मागविण्यात आले आहेत. १४ मे पर्यंत अर्ज करता येणार असून १० जूनपासून नवीन सत्रास प्रारंभ होणार आहे. तांत्रिक व अतांत्रिक पद्धतीचे अभ्यासक्रम या विद्यापीठाद्वारे चालविण्यात येतात. तांत्रिक अभ्यासक्रमात बीटेक आणि एमटेक हा अभ्यासक्रम चालविण्यात येतो. यासाठी इयत्ता बारावीमध्ये (पीसीएम ग्रुप) किमान ६० टक्के गुण प्राप्त विद्यार्थी अर्ज करण्यास पात्र आहेत. बीबीए अभ्यासक्रमासाठी कोणत्याही विद्याशाखेतून किमान ५० टक्के गुणांनी उत्तीर्ण विद्यार्थी पात्र आहेत. तर एमबीए अभ्यासक्रमासाठी कोणत्याही विद्याशाखेतून किमान ५५ टक्के गुणांनी पदवी प्राप्त करणारे विद्यार्थी पात्र ठरतील.

एकूण १७ खाजगी महाविद्यालये या विद्यापीठाशी संलग्न आहेत व त्यांची क्षमताही तीन हजार विद्यार्थ्यांची असल्याचे शंकर यांनी सांगितले. नवीन शैक्षणिक सत्रासाठी अर्ज मागविण्यात येत असून १४ मे ही अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख आहे. तसेच अध्यापकांच्या २६ जागांसाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. या दोन्हीही संधींचा विदर्भातील विद्यार्थी व पात्र उमेदवारांनी लाभ घ्यावा आणि करिअरच्यादृष्टीने महत्त्वाच्या आणि वेगळ्या क्षेत्राकडे वळावे, असे आवाहनही कुलगुरू मालिनी शंकर यांनी केले.

प्रति,

# वृत्तपत्र कात्रणे

महाराष्ट्र शासन
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
नागपूर-अमरावती विभाग,
जुने सचिवालय, नागपूर
dirinfngp@gmail.com /dirnfingp2015@gmail.com
दूरध्वनी : ०७१२-२५६५१०८, २५६०६५२

dirinfngp.blogspot.in
@InfoVidarbha
dirinf Nagpur


वृत्तपत्राचे नाव : दैनिक लोकसत्ता

प्रकाशन स्थळ : नागपूर

दिनांक : 18 APR 2023

# भारतीय सागरी विद्यापीठात विद्यार्थ्यांना संधी

## कुलगुरू मालिनी शंकर यांची माहिती

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**नागपूर:** समुद्र व त्याच्याशी निगडीत जहाज बांधणी, प्रशिक्षण, व्यवस्थापन असे विविध अभ्यासक्रम उपलब्ध करून देणाऱ्या चेन्नई स्थित भारतीय सागरी विद्यापीठाच्या नवीन शैक्षणिक सत्रासाठी अर्ज मागविण्यात येत असून १४ मे ही अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख आहे. अध्यापकाच्या २६ जागांसाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. या दोन्ही संधीचा विदर्भातील विद्यार्थी व पात्र उमेदवारांनी लाभ घ्यावा आणि करियरच्यादृष्टीने महत्वाच्या व वेगळ्या क्षेत्राकडे वळावे, असे आवाहन भारतीय सागरी विद्यापीठाच्या कुलगुरू मालिनी शंकर यांनी केले.

विद्यापीठाच्या नवीन शैक्षणिक सत्रातील प्रवेश आणि अध्यापकांच्या पदभरतीबाबत शंकर यांनी माध्यमांना आज माहिती दिली. विद्यापीठाचे कोची, मुंबई, नवी मुंबई, कोलकत्ता, चेन्नई, विशाखापट्टनम येथे शैक्षणिक परिसर असून येथे ३ हजार विद्यार्थ्यांची क्षमता आहे. एकूण १७ खाजगी महाविद्यालये या विद्यापीठाशी संलग्न आहेत व त्यांची क्षमताही ३ हजार विद्यार्थ्यांची असल्याचे शंकर यांनी सांगितले. विद्यापीठाच्या नवीन शैक्षणिक सत्रासाठी १४ एप्रिल पासून अर्ज मागविण्यात आले आहेत. १४ मे पर्यंत अर्ज करता येणार असून १० जूनपासून नवीन सत्रास प्रारंभ होणार आहे. तांत्रिक व अतांत्रिक पध्दतीचे अभ्यासक्रम या विद्यापीठाद्वारे चालविण्यात येतात. तांत्रिक अभ्यासक्रमांत बी.टेक आणि एम.टेक हे अभ्यासक्रम आहेत. यात प्रवेशासाठी इयत्ता १२ वी मध्ये (पीसीएम ग्रुप) किमान ६० टक्के गुण आवश्यक आहे. बी.बी.ए. अभ्यासक्रमासाठी कोणत्याही विद्याशाखेतून किमान ५० टक्के गुणांनी उत्तीर्ण विद्यार्थी पात्र ठरतील.



तर एम.बी.ए. अभ्यासक्रमासाठी कोणत्याही विद्याशाखेतून किमान ५५ टक्के गुणांनी पदवी प्राप्त करणारे विद्यार्थी पात्र ठरतील.

## अग्निवीरांसाठी ऑनलाइन सामाईक प्रवेश परीक्षा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नागपूर :** अग्निवीरांच्या सर्व श्रेणींसाठी ऑनलाइन सामाईक प्रवेश परीक्षा १७ ते २६ एप्रिल या कालावधीत नागपूर येथील विविध परीक्षा केंद्रांवर आयोजित करण्यात येत आहे. ही परीक्षा नागपूर येथे टेकग्रेसर सॉफ्ट सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड आणि बालाजी इन्फोटेक आणि अमरावती येथे विन्सर इन्फोटेक अँड एएमपी, पीसी पाईन्ट, प्लॅनेट प्लाझा तर्फे घेतली जाणार आहे.

करण्यासाठी

प्रति,

............

............

............

शामुना-वाय-१६८-जिम

Scanned with OKEN Scanner

# वृत्तपत्र कात्रणे

महाराष्ट्र शासन
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
नागपूर-अमरावती विभाग,
जुने सचिवालय, नागपूर
dirinfngp@gmail.com /dirnfingp2015@gmail.com
दूरध्वनी : ०७१२-२५६५१०८, २५६०६५२

dirinfngp.blogspot.in @InfoVidarbha dirinf Nagpur

वृत्तपत्राचे नाव : दैनिक देशोन्नती

प्रकाशन स्थळ : नागपूर

दिनांक : 18 APR 2023


# सागरी विद्यापीठात करिअरचे विविध पर्याय उपलब्ध

विद्यापीठाच्या नवीन शैक्षणिक सत्रातील प्रवेश आणि अध्यापकांच्या भरावयाच्या पदांबाबत त्यांनी माध्यमांना माहिती दिली. सागरी विद्यापीठाद्वारे चालविण्यात येणाऱ्या विविध अभ्यासक्रमांना विदर्भातील विद्यार्थ्यांनी प्रवेश घेऊन करिअरसाठी नवा पर्याय निवडण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. विद्यापीठाचे कोची, मुंबई, नवी मुंबई, कोलकत्ता, चेन्नई, विशाखापट्टनम येथे कॅम्पस असून येथे ३ हजार विद्यार्थ्यांची क्षमता आहे. एकूण १७ खाजगी महाविद्यालये या विद्यापीठाशी संलग्न आहेत व त्यांची क्षमताही ३ हजार विद्यार्थ्यांची असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यापीठाच्या नवीन शैक्षणिक सत्रासाठी १४ एप्रिलपासून अर्ज मागविण्यात आले आहेत. १४ मेपर्यंत अर्ज करता येणार असून १० जूनपासून नवीन सत्रास प्रारंभ होणार आहे. तांत्रिक व अतांत्रिक पध्दतीचे अभ्यासक्रम या विद्यापीठाद्वारे चालविण्यात येतात. तांत्रिक अभ्यासक्रमांत बी.टेक आणि एम.टेक हा अभ्यासक्रम चालविण्यात येतो. यासाठी इयत्ता १२ वी मध्ये (पीसीएम ग्रुप) किमान ६० टक्के गुण प्राप्त विद्यार्थ्यांना अर्ज करण्यास पात्र राहतील. बी.बी.ए. अभ्यासक्रमासाठी कोणत्याही विद्याशाखेतून किमान ५० टक्के गुणांनी उत्तीर्ण विद्यार्थी पात्र ठरतील. तर एम.बी.ए. अभ्यासक्रमासाठी कोणत्याही विद्याशाखेतून किमान ५५ टक्के गुणांनी पदवी प्राप्त करणारे विद्यार्थी पात्र ठरतील, अशी माहितीही त्यांनी दिली. याशिवाय अध्यापक पदांच्या २६ जागांसाठी ४ मेपर्यंत अर्ज करता येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

...T करण्यासाठी

प्रति,

.....................................................

.....................................................

.....................................................



Scanned with OKEN Scanner

# वृत्तपत्र कात्रणे

महाराष्ट्र शासन
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
नागपूर-अमरावती विभाग,
जुने सचिवालय, नागपूर

dirinfngp@gmail.com /dirnfingp2015@gmail.com
दूरध्वनी : ०७१२-२५६५१०८, २५६०६५२

dirinfngp.blogspot.in | @InfoVidarbha | dirinfNagpur

वृत्तपत्राचे नाव : दैनिक लोकशाही वार्ता

प्रकाशन स्थळ : नागपूर

दिनांक : 18 APR 2023

# भारतीय सागरी विद्यापीठात करियरचे विविध पर्याय उपलब्ध

## कुलगुरू मालिनी शंकर : नवीन शैक्षणिक सत्रासाठी १४ मेपर्यंत करा अर्ज

लोकशाही वार्ता / नागपूर

समुद्र व त्याच्याशी निगडीत जहाज बांधणी, प्रशिक्षण, व्यवस्थापन असे विविध कोर्सेस उपलब्ध करून देणाऱ्या चेन्नई स्थित भारतीय सागरी विद्यापीठाच्या नवीन शैक्षणिक सत्रासाठी अर्ज मागविण्यात येत असून १४ मे ही अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख आहे. तर अध्यापकांच्या २६ जागांसाठी पात्र उमेदवारांना अर्ज मागविण्यात येत आहेत. या दोन्हीही संधीचा विदर्भातील विद्यार्थी व पात्र उमेदवारांनी लाभ घ्यावा आणि करियरच्यादृष्टीने महत्त्वाच्या व वेगळ्या क्षेत्राकडे वळावे, असे आवाहन भारतीय सागरी विद्यापीठाच्या कुलगुरू मालिनी शंकर यांनी केले आहे.

विद्यापीठाच्या नवीन शैक्षणिक सत्रातील प्रवेश आणि अध्यापकांच्या भरावयाच्या पदांबाबत शंकर यांनी माध्यमांना सोमवारला माहिती दिली. सागरी विद्यापीठाद्वारे चालविण्यात येणाऱ्या विविध अभ्यासक्रमाला विदर्भातील विद्यार्थ्यांनी प्रवेश घेऊन करियरसाठी नवा पर्याय निवडण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. विद्यापीठाचे कोची, मुंबई, नवी मुंबई, कोलकत्ता, चेन्नई, विशाखापट्टनम येथे कॅम्पस असून येथे ३ हजार विद्यार्थ्यांची क्षमता आहे. एकूण १७ खासगी महाविद्यालये या विद्यापीठाशी संलग्न आहेत व त्यांची



क्षमताही ३ हजार विद्यार्थ्यांची असल्याचे शंकर यांनी सांगितले. त्या पुढे म्हणाल्या की, विद्यापीठाच्या नवीन शैक्षणिक सत्रासाठी १४ एप्रिल पासून अर्ज मागविण्यात आले आहेत. १४ मे पर्यंत अर्ज करता येणार असून १० जूनपासून नवीन सत्रास प्रारंभ होणार आहे.

### अध्यापक पदांच्या २६ जागांसाठी ४ मे पर्यंत अर्ज करता येणार

विद्यापीठाने सहयोगी प्राध्यापक पदांच्या १४ जागांसाठी तर सहायक प्राध्यापक पदांच्या १२ जागांसाठी अर्ज मागविले आहेत. समुद्र अभियांत्रिकीच्या ७ आणि नॉटीकल सायन्सच्या ७ अशा एकूण १४ सहयोगी प्राध्यापकांच्या जागा आहेत. यातील ७ जागा आरक्षित तर उर्वरित ७ जागा अनारक्षित आहेत. समुद्र अभियांत्रिकीच्या ६ आणि नॉटीकल सायन्सच्या ६ अशा एकूण १२ सहायक प्राध्यापकांच्या जागा आहेत. यातील ७ जागा आरक्षित तर उर्वरित ५ जांगा अनारक्षित आहेत. या पदांसाठी ४ मे पर्यंत ऑनलाईन अर्ज स्वीकारले जातील.

तांत्रिक व अतांत्रिक पद्धतीचे अभ्यासक्रम या विद्यापीठाद्वारे चालविण्यात येतात. तांत्रिक अभ्यासक्रमांत बी.टेक आणि एम.टेक हा अभ्यासक्रम चालविण्यात येतो. यासाठी इयत्ता १२ वी मध्ये (पीसीएम ग्रुप) किमान ६० टक्के गुण प्राप्त विद्यार्थ्यांना अर्ज करण्यास पात्र राहतील. बी.बी.ए. अभ्यासक्रमासाठी कोणत्याही विद्याशाखेतून किमान ५० टक्के गुणांनी उत्तीर्ण विद्यार्थी पात्र ठरतील. तर एम.बी.ए. अभ्यासक्रमासाठी कोणत्याही विद्याशाखेतून किमान ५५ टक्के गुणांनी पदवी प्राप्त करणारे विद्यार्थी पात्र ठरतील. विविध अभ्यासक्रमांसाठी मागविण्यात आलेल्या अर्जांबाबत आणि अध्यापक पदांच्या जागांबावत सविस्तर माहिती विद्यापीठाच्या www.imu.ac.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचेही शंकर यांनी सांगितले.

प्रति,

..........................................................

..........................................................

..........................................................

मुना-वाय-१६८-जिमानाअ-६-२०२२-१५,००० प्रती-पीए४.

Scanned with OKEN Scanner

**कुलगुरू मालिनी शंकर : वेगळे क्षेत्र निवडा, विदर्भातील विद्यार्थ्यांना लाभ घेण्याचे आवाहन**

# सागरी विद्यापीठात करिअरचे अनेक पर्याय

नागपूर. देशाला विस्तीर्ण सागरी किनारपट्टी लाभली आहे. समुद्राशी संबंधित करिअरच्या अनेक संधी आपल्याकडे आहे. त्यासाठी आवश्यक अभ्यासक्रमही चेन्नई येथील भारतीय सागरी विद्यापीठामार्फत चालविले जातात. विदर्भातील विद्यार्थ्यांनी करियरच्यादृष्टीने महत्वाच्या व वेगळ्या क्षेत्राकडे वळावे, असे आवाहन भारतीय सागरी विद्यापीठाच्या कुलगुरू मालिनी शंकर यांनी केले.

विद्यापीठाच्या नवीन शैक्षणिक सत्रातील प्रवेश आणि विद्यापीठातील अध्यापकांच्या पदभरतीबाबत शंकर यांनी माध्यम प्रतिनिधींना आज माहिती दिली. समुद्र व त्याच्याशी निगडीत जहाज बांधणी, प्रशिक्षण, व्यवस्थापन असे विविध अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. विद्यापीठाचे कोची, मुंबई, नवी मुंबई, कोलकत्ता, चेन्नई, विशाखापट्टनम येथे कॅम्पस असून येथे 3 हजार विद्यार्थ्यांची क्षमता आहे. एकूण 17 खाजगी महाविद्यालये या विद्यापीठाशी संलग्न आहेत व त्यांची क्षमताही 3 हजार विद्यार्थ्यांची असल्याचे शंकर यांनी सांगितले. सविस्तर माहिती विद्यापीठाच्या www.imu.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.



## नवीन शैक्षणिक सत्रासाठी 14 मेपर्यंत अर्ज करण्याची मुदत

विद्यापीठाच्या नवीन शैक्षणिक सत्रासाठी 14 एप्रिलपासून अर्ज सादर करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. इच्छुकांना 14 मे पर्यंत अर्ज करता येणार आहे. 10 जूनपासून नवीन सत्र प्रारंभ होईल.

तांत्रिक व अतांत्रिक पध्दतीचे अभ्यासक्रम या विद्यापीठाद्वारे चालविण्यात येतात. तांत्रिक अभ्यासक्रमांत बी. टेक आणि एम. टेक हे अभ्यासक्रम आहेत. यात प्रवेशासाठी इयत्ता 12 वी मध्ये (पीसीएम गृप) किमान 60 टक्के गुण आवश्यक आहे. बी.बी.ए. अभ्यासक्रमासाठी कोणत्याही विद्याशाखेतून किमान 50 टक्के गुणांनी उत्तीर्ण विद्यार्थी पात्र ठरतील. तर एम.बी.ए. अभ्यासक्रमासाठी कोणत्याही विद्याशाखेतून किमान 55 टक्के गुणांनी पदवी प्राप्त करणारे विद्यार्थी पात्र ठरतील.

## प्राध्यापक पदाच्या 26 जागांसाठी भरती प्रक्रिया

विद्यापीठाने सहयोगी प्राध्यापक पदांच्या 14 जागांसाठी तर सहाय्यक प्राध्यापक पदांच्या 12 जागांसाठी अर्ज मागविण्यात आले आहेत. समुद्र अभियांत्रिकीच्या 7 आणि नॉटीकल सायन्सच्या 7 अशा एकूण 14 सहयोगी प्राध्यापकांच्या जागा आहेत. यातील 7 जागा आरक्षित तर उर्वरित 7 जागा अनारक्षित आहेत. समुद्र अभियांत्रिकीच्या 6 आणि नॉटीकल सायन्सच्या 6 अशा एकूण 12 सहायक प्राध्यापकांच्या जागा आहेत. यातील 7 जागा आरक्षित तर उर्वरित 5 जागा अनारक्षित आहेत. या पदांसाठी 4 मे पर्यंत ऑनलाईन अर्ज पाठविता येईल. नवी मुंबई, चेन्नई, विशाखापट्टनम आणि कोची येथे कॅम्पस डायरेक्टरच्या प्रत्येकी एक याप्रमाणे एकूण 4 जागांसाठी 2 मेपर्यंत अर्ज मागविण्यात आले आहेत.

Scanned with OKEN Scanner

# वृत्तपत्र कात्रणे

महाराष्ट्र शासन
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
नागपूर-अमरावती विभाग,
जुने सचिवालय, नागपूर

dirinfngp@gmail.com /dirnfingp2015@gmail.com
दूरध्वनी : ०७१२-२५६५१०८, २५६०६५२

dirinfngp.blogspot.in @InfoVidarbha dirinfNagpur

वृत्तपत्राचे नाव : दैनिक तरुण भारत

प्रकाशन स्थळ : नागपूर

दिनांक : 18 APR 2023

# सागरी विद्यापीठात करीअरचे विविध पर्याय

## कुलगुरू मालिनी शंकर यांची माहिती ● अध्यापकांच्या २१ जागांवर भरती

◆ नागपूर, १७ एप्रिल

समुद्र व त्याच्याशी निगडीत जहाजबांधणी, प्रशिक्षण, व्यवस्थापन असे विविध अभ्यासक्रम उपलब्ध करुन देणाऱ्या चेन्नईतील भारतीय



सागरी विद्यापीठाच्या नवीन शैक्षणिक सत्रासाठी अर्ज मागविण्यात येत असून, १४ मे ही अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख आहे. येथील अध्यापकांच्या २६ जागांसाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. या दोन्ही संधीचा विदर्भातील विद्यार्थी व पात्र उमेदवारांनी लाभ घ्यावा आणि करियरच्यादृष्टीने महत्वाच्या व वेगळ्या क्षेत्राकडे वळावे, असे आवाहन भारतीय सागरी विद्यापीठाच्या कुलगुरु मालिनी शंकर यांनी केले आहे.

विद्यापीठाच्या नवीन शैक्षणिक सत्रातील प्रवेश आणि अध्यापकांच्या पदभरतीबाबत शंकर यांनी माध्यमांना माहिती दिली. विद्यापीठाचे कोची, मुंबई, नवी मुंबई, कोलकत्ता, चेन्नई, विशाखापट्टनम येथे कॅम्पस असून, येथे ३ हजार विद्यार्थ्यांची क्षमता आहे. एकूण १७ खाजगी महाविद्यालये या विद्यापीठाशी संलग्न आहेत. त्यांची क्षमताही ३ हजार विद्यार्थ्यांची असल्याचे शंकर यांनी सांगितले. (तभा वृत्तसेवा)

### सत्राला १० जूनपासून सुरुवात

विद्यापीठाच्या नवीन शैक्षणिक सत्रासाठी १४ एप्रिलपासून अर्ज मागविण्यात आले आहेत. १४ मे पर्यंत अर्ज करता येणार असून १० जूनपासून नवीन सत्रास प्रारंभ होणार आहे. तांत्रिक व अतांत्रिक पद्धतीचे अभ्यासक्रम या विद्यापीठाद्वारे चालविण्यात येतात. तांत्रिक अभ्यासक्रमांत बी.टेक आणि एम.टेक आहेत. यात प्रवेशासाठी बारावीला (पीसीएम ग्रुप) किमान ६० टक्के गुण आवश्यक आहेत. बी.बी.ए. अभ्यासक्रमासाठी कोणत्याही विद्याशाखेतून किमान ५० टक्के गुणांनी उत्तीर्ण विद्यार्थी पात्र ठरतील. एम.बी.ए. अभ्यासक्रमासाठी कोणत्याही विद्याशाखेतून किमान ५५ टक्के गुणांनी पदवी प्राप्त करणारे विद्यार्थी पात्र ठरतील.

### १४ जागा राखीव

विद्यापीठाने सहयोगी प्राध्यापक पदांच्या १४ जागांसाठी तर सहायक प्राध्यापक पदांच्या १२ जागांसाठी अर्ज मागविले आहेत. समुद्र अभियांत्रिकीच्या ७ आणि नॉटीकल सायन्सच्या ७ अशा एकूण १४ सहयोगी प्राध्यापकांच्या जागा आहेत. यातील ७ जागा आरक्षित, तर उर्वरित ७ जागा अनारक्षित आहेत. समुद्र अभियांत्रिकीच्या ६ आणि नॉटीकल सायन्सच्या ६ अशा एकूण १२ सहायक प्राध्यापकांच्या जागा आहेत. यातील ७ जागा आरक्षित तर उर्वरित ५ जागा अनारक्षित आहेत. या पदांसाठी ४ मे पर्यंत ऑनलाईन अर्ज स्विकारले जातील. नवी मुंबई, चेन्नई, विशाखापट्टनम आणि कोची येथे कॅम्पस डायरेक्टरच्या प्रत्येकी एक याप्रमाणे एकूण ४ जागांसाठी अर्जही मागविण्यात आले असून २ मे पर्यंत अर्ज करता येणार आहे.